# महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा




कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी संस्था सचिव शिवाजीराव पाटील,डॉ.विजयकुमार पाटील,डॉ.बी.एन.रावण,डॉ.एस.एस. कुरलीकर,डॉ.मनीषा सावंत व मान्यवर

२६ जुलै रोजी भारतीय सैन्यांनी कारगिल येथे पाकिस्तानी सैन्यावर चढाई करून ऑपरेशन विजय द्वारे विजय संपादन केला.हा विजय मिळवण्यासाठी ५२७ जवानांचे बलिदान कामी आले.या जवानांना आदरांजली वाहने आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.आपण देशामध्ये निश्चिंतपणे जगत असतो. यामध्ये जवानांच्या शौर्याचा बलिदानाचा आणि त्यागाचा खूप मोठा वाटा आहे.असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज , माळवाडी - कोतोली येथील राष्ट्रीय छात्रसेना विभाग (एन.सी.सी.) यांनी कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार पाटील बोलत होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण, सहसमन्वक डॉ. एस. एस. कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ले. डॉ. मनीषा सावंत यांनी केले सूत्रसंचालन कॅडेट श्रीनाथ डवरी याने केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.